Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 336-339

DOI: 10.5281/zenodo.10125837

Original Research Article

# महात्मा गांधीजींच्या ग्रामविकासात श्रमप्रतिष्ठा व यंत्रविरोधाचे महत्त्व

प्रा. डॉ. अनिता प्रेमराज भोळे

तत्त्वज्ञान विभाग, स्वा. सै. सूर्यभानजी पवार महाविद्यालय पूर्णा ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: purnanet358@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

भारत हा क्रषिप्रधान देश आहे. त्यामुळे देशाच्या एकूण लोकसख्येच्या जवळपास 70 ते 75 टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात. त्यामुळेच गावाचा विकास हाच देशाचा विकास हे सत्य लक्षात घेऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी आपल्या विचार व कार्यामध्ये सर्वाधिक महत्त्व दिले ते ग्रामविकासाला. शासकीय स्तरावर याची दखल घऊन आदर्श ग्राम योजना यासारख्या विविध योजना राबवल्या जात आहेत. याप्रकारच्या अनेक योजना शासन राबवीत असले तरी प्रत्यक्षात मात्र गावाचा म्हणावा तसा विकास झालेला दिसून येत नाही. राळेगणसिद्धी, पाटोदा, हिवरेबाजार अशा काही बोटावर मोजण्याइतकी गावे विकसित झाली म्हणजे देश विकसित झाला असे म्हणता येणार नाही. खेड्याचा देश म्हणून गणल्या जाणार्या देशाचा विकास हा केवळ बोटावर मोजण्याइतक्या गावाच्या विकासाने होणार नाही. हेही तितकेच सत्य मानावे लागेल.

### समस्या सूत्रण

ग्रामीण भागात विकासाच्या सुविधा अत्यल्प असल्यामुळे गावपातळीवर लोकांना असंख्य समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये बेकारी, रोगराई, अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याची समस्या, सामाजिक, आर्थिक विषमता, व्यसनाधिनता अकार्यक्षम प्रशासन आणि कमालीचे दारिद्रय यासारख्या कितीतरी समस्या गावात राहणार्या लोकांपुढे निर्माण होतात व त्यांचे जगणे असह्य होऊन जाते. या सगळ्या गोष्टींमुळे स्थलांतराशिवाय त्यांच्याकडे पर्याय राहत नाही. ते शहरांकडे धाव घेतात. यामुळे खेडी ओस पडून शहरे फुगत आहेत. शहरामध्ये होणार्या लोकसंख्येच्या वाढीमुळे तेथे नवनवीन समस्या डोके वर काढत आहेत. या सर्व समस्यांना पायबंद बसावा यासाठी महात्मा गांधीजींची ग्रामविकासाची संकल्पना निश्चितच उपयोगी पडेल.

### उद्दीष्ट्ये

१. महात्मा गांधीजींचे विचार समाजामध्ये रूजवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे.
२. मानवी मूल्यांची जोपासना करणे.
३. श्रमाचे महत्व पटऊन देऊन त्या दिशेने समाजाची वाटचाल करण्यास प्रोत्साहित करणे.

४. अधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात यंत्रवत होत चाललेल्या मानवी जीवनाला आवर घालणे.

**श्रमप्रतिष्ठा**

महात्मा गांधीजींनी आपल्या सबंध आयुष्यात मानवी श्रमाला मोलाचे स्थान दिले आहे. प्रत्येक माणूस जर जगण्याकरिता श्रम करू लागला तर प्रथ्वीतलावर स्वर्ग निर्माण होईल. आपल्या भाकरीकरिता प्रत्येक जण जर श्रम करू लागला तर अखिल विश्वाचे कल्याण होईल. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. यंग इंडिया या आपल्या साप्ताहिकात त्यानी श्रमाचे महत्व पटऊन दिले आहे. त्यामध्ये ते म्हणतात की, श्रमाशिवाय जगणारे, खाणारे चोर आहेत. जे लोक श्रम करीत नाहीत त्यांना खाण्याचा काय अधिकार. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पोट भरण्यासाठी कोणत्याही प्रामाणिक मार्गाने कष्ट करणे अनिवार्य आहे. त्यासाठी शेती, कताई, पिंजाई, छोटे छोटे लघुउद्योग, शेतीतील कच्चा माल वापरून त्यावर प्रक्रीया करून विविध प्रकारचे कुटीर उद्योग इत्यादी मार्गांनी आपण आपला उदरनिर्वाह केला पाहीजे. असे ते वेळोवेळी सांगत.

एका ठराविक वयानंतर जसा आपल्याला मतदानाचा अधिकार दिला जातो तसेच प्रत्येक व्यक्तीने एका ठराविक वयानंतर श्रम करण्यास प्रारंभ केला पाहीजे. जोपर्यंत जगात एकही धडधाकट माणूस कामाशिवाय आहे, तोपर्यंत आपल्याला आराम करताना किंवा पोटभर जेवताना लाज वाटली पाहीजे. असे महात्मा गांधीजींचे स्पष्ट मत होते.

श्रम आणि भांडवल यांच्यातील विश्वव्यापी संघर्ष पाहता गरिबांचा भौतीक विकास आणि श्रीमंतांचा नैतिक विकास झाला पाहिजे असे ते नेहमी म्हणत. समाजातील सर्वच स्तरातील लोकांनी जर श्रमाला प्राधान्य देऊन श्रम करण्यास सुरूवात केली तर गरीब श्रीमंतांमध्ये जी विशाल दरीतील अंतर निश्चितच कमी होऊन गोरगरिबांच्या जीवनातील असंख्य समस्यांना पायबंद बसेल. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. सेवेच्या हेतुने केलेले शारीरिक श्रम स्त्री पुरूषांना जगण्याचा हक्क मिळवून देते. यालाच गीतेत यज्ञ असे म्हटले आहे. म्हणून जी व्यकती यज्ञाशिवाय भोजन करते ती चोरीचे अन्न खाते. असे गीतेचे वचन आहे. ख्रिश्चनांचा पवित्र ग्रंथ बायबलमध्येही तू घाम गाळून आपली भाकरी मिळव असे सांगितले आहे. सर्व लोक जर भाकरीकरिता श्रम करू लागले तर सर्वांना भोजन मिळेल, सुख मिळेल, आनंद मिळेल. यामुळे लोकसंख्येचा प्रश्न उरणार नाही. ना कोणी आजारी पडेल. असे महात्मा गांधी खात्रीपूर्वक सांगतात.

श्रमाचे महत्त्व सांगताना पुढे महात्मा गांधीजी म्हणतात, जर आपण आपल्या उदर्निर्वाहाकरिता श्रम करायला लागलो तर निश्चितच आपल्या गरजा मर्यादित होतील. खाण्यापिण्यात बदल होईल. व्यक्ती केवळ जगण्याकरिता खाईल, खाण्याकरिता जगणार नाही. जर कोणाला याबाबत शंका असेल तर त्याने प्रत्यक्ष हे करून पहावे. त्याला स्वतःच्या श्रमामुळे आनंदाचीच प्राप्ती होईल. त्याच्या आरोग्यात सुधारणा होईल. ज्या गोष्टींचा तो लालसेपोटी उपभोग घेत होता त्या कितीतरी गोष्टी व्यर्थ असल्याचे त्याच्या लक्षात येईल.

आज संपूर्ण जगभर महात्मा गांधी एक व्यक्ती यापेक्षा एक विचार किंवा जगण्याचा एक द्रष्टीकोन म्हणून त्यांच्याकडे पाहीले जाते. त्यांच्या विचारांची जडणघडण ही जॉन रस्कीनच्या **अन् टू धिस लास्ट** या पुस्तकाच्या वाचनाच्या प्रभावातून झाली. व्यक्तीच्या व्यवसायावरून तिच्या कामाचे मूल्य ठरवता येत नाही. हे रस्कीनचे विचार गांधीजींच्या मनात खोलवर घर करून जातात. वकील असो किंवा न्हावी दोघांच्याही श्रमाचे मूल्य सारखेच असते. कारण समाजाला दोघांच्याही कामाची तितकीच गरज असते.

ते केवळ श्रमाचे महत्व सांगत नसत तर आपल्या प्रत्यक्ष क्रतीतून त्यांनी ते दाखऊन दिले आहे. फिनिक्स किंवा टॉलस्टॉय फॉर्ममध्ये अनेक कामे स्वतः केली होती. त्यामध्ये सफाई कामापासून ते सूत कातण्यापर्यंतची सर्व कामे ते स्वतः करत. वर्तमान जगात जी आर्थिक विषमता दिसून येते तिला पायबंद बसावा यासाठी सर्वांनीच आपल्या उदरर्निवाहाकरिता काम करण्याची तयारी दर्शवावी. या पद्धतीने सर्वांनी जगण्याचा निश्चय केला तर ही गोष्ट सर्वोत्तम ठरेल. परंतु सद्यस्थिती जर लक्षात घेतली तर सर्वत्र असे चित्र दिसून येते की, कष्ट करणे नकोसे वाटत आहे. ग्रामजीवन

तर अतिशय हालाखीचे आहे. याचे कारण तेथील लोकांचे अज्ञान, परावलंबीत्वाची भावना, अधुनिकीकरणाची भूरळ, शिक्षणाबाबतची अस्थिरता यामुळे ग्रामीण भागाचा विकास होत नाही. त्यामुळे खर्या अर्थाने गांधीजींचे श्रमप्रतिष्ठेबाबत असलेले विचार आत्मसात करण्याची गरज आहे.

**यंत्रविरोध**

प्रचंड लोकसंख्या असलेला आपला भारत देश आहे. त्यातच खेड्यात राहून शेतीवर उपजिविका करणार्या लोकांची संख्या सत्तर टक्क्यापेक्षा अधिक आहे. त्यामुळे अशा देशाच्या विकासाची वाटचाल ही ज्या भागात लोकांचे वास्तव्य अधिक त्या भागाचा विकास मोठ्या प्रमाणात होणे अपेक्षित असते. परंतु आपल्या देशाचे चित्र उलट आहे. येथे ग्रामीण भाग दुर्लक्षित राहून शहरे अधिकाधिक सुशोभित करण्याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. या सर्व गोष्टीचा विपरित परिणाम गावपातळीवर होऊन गावांचे अस्तीत्व धोक्यात येत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता खरोखर आपल्याला जर आपल्या देशाचा देशातील सर्वच लोकांचा विकास करावयाचा असेल तर औद्योगिकरण करून यांत्रिकीकरणाची कास धरणे उचित ठरणार नाही. हे महात्मा गांधीजींना माहीत होते. त्यामुळे त्यांनी ग्रामजीवनाचा विकास करण्यासाठी यांत्रिकीकरणाला विरोध केला.

आजचे युग हे अधुनिक तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने उच्च शिखर गाठले आहे. मानवी जीवन सुखी सम्रद्धी झाले पाहिजे. असे सर्वांनाच वाटते आहे. त्यासाठीच मानवाने तंत्रज्ञानाच्या आधारे नवनवीन उपकरणे तयार केली. त्यातूनच अनेक नवनवीन यंत्रांचा जन्म झाला. त्यांच्या प्रचंड वेग व विकासामुळे कमी कालावधीत पक्का माल तयार होऊ लागला. त्याचा परिणाम असा झाला की, ग्रामीण भागातील अकुशल कामगार बेकार झाले. त्यांच्या हाताला काम राहिले नाही. परिणामी बेकारांची संख्या वाढत गेली. हेच गांधींना नको होते. त्यामुळे त्यांचा यांत्रिकीकरणाला विरोध होता.

महात्मा गांधजींचा सर्वच यंत्रांना विरोध नव्हता. श्रम हलके करणार्या यंत्राचा त्यांनी कधीही विरोध केला नाही. ज्या यंत्रांमुळे माणसे अधिक बेकार होतील, लोकांना रोजगार मिळणार नाही. अनेक लोकांची उपासमार होईल व बेकारांच्या संख्येत वाढ होऊन नवीन समस्या निर्माण होणार नाहीत अशा यंत्रास त्यांनी विरोध केला. माणसाचे श्रम हलके करणार्या यंत्रांचे त्यांनी स्वागतच केले. त्यामुळे महात्मा गांधी हे यंत्रद्वेष्टे नव्हते तर ते यंत्रविवेकी होते असे म्हणता येईल.

यंत्रवापराबाबत गांधीजींचे स्पष्ट असे मत होते की, हजारो लोकांना आपल्या पारंपारिक व्यवसायात गुंतवून ठेवणारी व सर्वांच्याच परिश्रमातून गरजेपेक्षा अधिक उत्पादन करणारी हस्त्योद्योग, शेती उद्योगावर आधारीत श्रमप्रधान उत्पादनव्यवस्था श्रेयस्कर की, लक्षावधी लोकांचा रोजगार काढून घेणारी, त्यांचे विस्थापण करणारी आणि त्यांची सर्जनशिलता हिरावून घेणारी उत्पादनव्यवस्था श्रेयस्कर. असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी बेरोजगारी, शोषण आणि आर्थिक विषमता या दुष्टचक्रांना पायबंद घालण्यासाठी यंत्रांना विरोध दर्शवला.

आज मुठभर लोकांना लाखो लोकांचा रोजगार हिरावून घेण्याकरिता यंत्र मदत करत आहेत. यंत्राचा वापर हा माणसांचे श्रम हलके करणे हा उद्देश नसून केवळ हव्यासापोटी अधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. याबाबत त्याचे असे मत आहे की, यंत्रांच्या मालकांनी केवळ आपल्याच हिताचा विचार न करता संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा विचार करावा. आज यंत्रांचा वापर हा लाखो लोकांच्या तोंडातील घास हिरावून घेणे, त्यांची उपेक्षा करणे व मुठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण करणे याकरिता होत आहे. हेच गांधीजींना मान्य नव्हते. प्रत्येक व्यक्ती या मार्गाने सुखी, समाधानी होऊ शकणार नाही. हे सत्य त्यांना माहीत होते त्यामुळे त्यांचा यंत्राला विरोध होता.

गावामध्ये राहणार्या लोकांना आराम कसा द्यावा ही आपल्या समोरील समस्या नसून या लोकांना त्यांच्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग कसा करायला लावावा हे त्याला सांगणे महत्त्वाचे आहे. अनेकांना असे वाटते की, लाखो

लोकांचे शारीरिक श्रम वाचवून त्याना बौद्धिक कामाकरीता अधिक वेळ यंत्रांमुळे मिळत असेल तर त्यात काय वाईट आहे. यावर महात्मा गांधीजींचे अतिशय समर्पक उत्तर आहे. ते म्हणतात की, माणसाला एका सिमेपर्यंत आराम चांगला व आवश्यक आहे. ईश्वराने आम्हाला शारीरिक श्रम करून आपली भाकरी स्वतः कमावण्याकरिता निर्माण केले आहे. हे जर आम्हाला काम न करता मिळत गेले तर आमची एका सूस्त व आळशी प्राण्यागत अवस्था हईल. कोणतेही काम आम्हाला करावेसे वाटणार नाही. किंवा ते होणारही नाही. हे आमच्या आरोग्याच्या द्रष्टीने अतिशय घातक स्वरूपाचे आहे.

कारखाना शेकडो लोकांना काम देतो व हजारो लोकांना बेकार करतो. एका तेलाच्या मीलमधून हजारो टन तेलाचे उत्पादन होत असेल, पण त्यामुळे हजारो तेली बेकार होतील. लाखो लोकांच्या हातांनी केलेले काम हे रचनात्मक असते. या पद्धतीने काम केल्यामुळे सर्वांचे कल्याण होत असते. म्हणूनच महात्मा गांधी आपल्या ग्रामविकासाच्या कल्पनेत यंत्राला विरोध करतात.

**संदर्भ सूची**

१. यंग इंडिया - महात्मा गांधी
२. ग्रामस्वराज - भाऊ धर्माधिकारी
३. गांधी विचारदर्शन - अर्थकारण, निधी प्रकाशन पुणे